# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

*३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.*

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार - edutech E-mail : desk4a@dte.org.in Internet :http//www.dte.org.in


क्र.:४अ/आस्था/माहितीचा अधिकारी-मेस्त्री/२०१२/2992

दि. 24 DEC 2012

प्रति,

१.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/
अमरावती/नागपूर.

२. संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
मुंबई – ४०० ०५१.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अन्वये माहिती पुरविणेबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र.माअअ-२०१२/प्र.क्र.१२०/१२/तांशि-७,
दि. २४ सप्टें. २०१२.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन श्री नारायण शंकर मेस्त्री यांनी त्यांच्या दि.२७ ऑगस्ट २०१२ रोजीच्या अर्जान्वये अर्जात नमूद १ ते ३ च्या मुद्दांची माहिती शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागीतलेली आहे. त्यानुषंगाने शासनाच्या संदर्भाधिन पत्रान्वये अर्जदार श्री नारायण शंकर मेस्त्री यांचा अर्ज संचालनालयास प्राप्त झालेला आहे. (अर्जाची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.)

याअनुषगांने आपणास कळविण्यांत येते की, दि. १३ जून २०१२ रोजीच्या शासकिय निर्णयातील निर्देशानुसार बदली आदेशातील बदली झालेल्या अधिव्याखात्यांच्या रुजू अहवालाबाबतच्या कार्यपालन अहवाल तात्काळ सादर करण्याबाबतची जबाबदारी आपली असल्याचे व अहवाल सादर करणे बाबत सूचित केलेले आहे. त्याअनुषंगाने संचालनालयाच्या स्तरावरुनही आपणास बरेचदा अहवाल सादर करणेबाबत सूचित केलेले आहे, तथापी अद्यापही सदरचा अहवाल अप्राप्त असल्याचे दिसून येते. तरी सदरचा अहवाल खालील विवरण पत्रात सादर करावा व त्याची एक प्रत अर्जदार श्री नारायण शंकर मेस्त्री यांना पुरविण्यांत यावी ही विनंती.

| अ. क्रं. | प्राचार्याचे/कार्यालय प्रमुखांचे नांव | बदली झालेल्या अध्यापकांचे नांव व शाखा | कार्यमुक्त केले आहे/नाही, असल्यास तारीख | कार्यमुक्त केले नसल्यास कारण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

आस्था/
१/१/१३

SP

सहसंचालक तंत्र शिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, अमरावती.
जा.क्र. ६६ दिनांक ०३/०१/२०१३.

आपला,

(द. श्री. कुकडे)
जन माहिती अधिकारी, तथा
प्रशासकीय अधिकारी,तंत्रशिक्षण म. रा., मुंबई.

प्रत:- १.श्री. सुधीर पं. शास्त्री, कार्यासन अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, विस्तारीत इमारत, मंत्रालय, मुंबई यांच्या माहितीकरीता.

२. श्री नारायण शंकर मेस्त्री, सी/९, सावित्री ब्लॉक, महाराणा प्रताप चौक, नवीन पनवेल, जिल्हा-रायगड, यांना कळविण्यांत येते की, आपल्या अर्जातील मुद्दा क्रं. १ व २ च्या मुद्दयाबाबतची माहिती आपणांस सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई/ पुणे/ नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर व संचालक, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना पुरविणे बाबत यांच पत्रान्वये कळविलेले आहे.

प्र.क्र. शिवाअ/आस्था/बदली/२०१३/३८
दिनांक १४/०१/२०१३.

प्रतिलिपी :- सदरची माहिती तात्काळ ईमेल द्वारे सादर करण्यात यावी.
(१) प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन अमरावती/वाशिम/यवतमाळ/खामगांव/मुर्तिजापूर
(२) प्राचार्य, शा. अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती (३) प्राचार्य शा. औषध निर्माण शास्त्र महा. अमरावती
(४) प्राचार्य, शा. निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ

सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती.

raj desk4a